**MHAU070023742025**

वादीतर्फे सा. क्र. १

वि.दि.दावा क्रमांक २५६/२०२५

निशाणी क्रमांक ४२ लगत

## उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री.चव्हाण यांच्या मार्फत

**९.** मी देवळाई औरंगाबाद या ठिकाणी राहतो. देवळाई ते सुलतानाबाद हे अंतर अंदाजे ३५ कि.मी आहे. गंगापूर तालुक्यामध्ये माझया नावाने कोणतीही शेतजमीन नाही. मी स्वत: गंगापूर तालुक्यामध्ये शेती कसलेली, पिकवलेली आहे. मी सन २००७ पासुन आजपर्यंत शेती करत आहे. साक्षीदाराला प्रश्न विचारला की, ३५ ते ४० कि.मी. दररोज येऊन जाऊन तुम्ही शेती करतात का, साक्षीदार सांगतो की, दररोज येत नाही, २ ते ३ दिवसाला येऊन शेती करतो. माझयाकडे मी शेती कसत असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा महसुल विभागाकडून प्राप्त केलेला नाही.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, सन २००७ ते २०१४ या कालावधीमध्ये मी ईसारपावतीवर कोणतीही कारवाई केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत माझया ताब्यात असल्याबाबत २००७ सालापासुन आजपर्यंत मी महसुल दप्तरी नोंद केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दादासाहेब यांनी मला दावा मिळकतीची ईसार पावती करुन दिलेली नाही. प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये पहीले कपास लावलेली होती, आता गहु पेरलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये विहीर खोदुन तेथे विज कनेक्शन घेतलेले आहे.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत महामार्गालगत असुन तेथे आता जागेची किंमत वाढलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, जमीन मिळावी या उददेशाने मी सदरचा दावा दाखल केला आहे. साक्षीदाराला प्रश्न विचारला की,

कोणत्याही ईसार पावतीवर अथवा कागदावर कोणताही मजकुर लिहीण्याचा तुम्हाला अधिकार आहे का, साक्षीदार सांगतो की, अधीकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दादासाहेब याला रु.४,१०,०००/– जमीन खरेदीसाठी दिले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दादासाहेब यांनी मला दावा मिळकतीची ईसार पावती लिहुन दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा मला दादासाहेब यांनी ताबा दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी माझया ताबा वहीवाटीला अडथळा केला हे मी खोटे सांगत आहे.

**१२.** दि.२९/११/२०१४ रोजी मी कोठे होतो हे मला आज रोजी आठवत नाही. दि.३०/११/२०२४ रोजी सुध्दा मी कोठे होतो हे मला आता सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींच्या विरुध्द खोटा दावा दाखल केला आहे व खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे कोणतीही ईसारपावती कोणत्याही साक्षीदारासमक्ष तयार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दादासाहेबाला सरतपासात नमुद केल्याप्रमाणे रक्कम दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा दादासाहेब यांच्या बरोबर दावा मिळकतीसंदर्भात कोणताही व्यवहार झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे खोटी व बोगस ईसार पावती तयार केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत ईसार पावतीवर दादासाहेबाच्या सहया नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र तयार केले व खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

NILESH RAJARAM INDALKAR Digitally signed by NILESH RAJARAM INDALKAR Date: 2026.01.07 17:41:27 +0530

दिनांकः– ०७/०१/२०२६

(निलेश रा. इंदलकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गंगापूर